**सोलापूर विद्यापीठ**
**पात्रता विभाग**
सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव, सोलापूर ४१३ २५५
ईपीएबीक्स - ०२१७ -२७४४७६०/६१/६३/६६/७१/७२/७३/७४/७८/७९ फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac

सोलापूर विद्यापीठ ॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

**Solapur University**
**Eligibility Section**
Solapur-Pune National Highway, Kegaon,
Solapur-413 255
EPABX No.0217- 2744760/61/63/66/71/72/73 /74/74/79 Fax No.0217-2744770
Web Site : http://su.digitaluniversity.ac


जा.क्र.सोविसो/पात्रता विभाग/२०१६-१७/8362 दि. 31 AUG 2016

(पात्रता विभाग- परिपत्रक क्र - ५)

प्रति,

सर्व बी.ए., बी.कॉम.व बी.एस्सी./ बी.एस्सी. (Entrepreneurship & Biotech)अभ्यासक्रम संलग्नित महाविद्यालये
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

विषय : १२ वी पुरवणी परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश व पात्रतेबाबत..

संदर्भ : १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.संकीर्ण -२०१६/प्र.क्र.(४८२/१६) विशि-३ दि.२६/०८/२०१६

२) शिक्षण संचलनालय, पुणे यांचे क्र. अमवि-२०१६/कोवि/शासनपत्र/१९५७३/मवि-२/१०१८५ दि.३०/०८/२०१६

३) पात्रता विभागाचे परिपत्रक क्र. सोविसो/पात्रता विभाग/परिपत्रक/२०१६-१७/५६७० दि.१७ जून,२०१६

महोदय/ महोदया,

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. १ व २ अन्वये महाराष्ट्र शासनाने शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील १२ वी पुरवणी परीक्षेमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून सर्व अकृषि विद्यापीठांनी प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया दि. १०/०९/२०१६ पर्यंत वाढविण्याबाबत निर्देशित केले आहे.

याबाबत आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, आपण १२ वी पुरवणी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना आपल्या महाविद्यालयामध्ये संदर्भिय परिपत्रक क्र. ०१ नुसार दि. १०/०९/२०१६ पर्यंत नियमीत शुल्कानुसार ( पात्रता व इतर शुल्क) प्रवेश द्यावेत.

सदरचे प्रवेश Software मधून करीत असताना पात्रता व इतर शुल्काचे Invoice व Mandate अतिरिक्त विलंब शुल्काप्रमाणे तयार होतील परंतु सदरच्या Mandate ची रक्कम बँकेमध्ये जमा न करता विद्यापीठाध्ये प्रत्यक्ष येवून विद्यार्थ्याचे शुल्क नियमित पध्दतीमध्ये जेवढे होईल तेवढी रक्कम जमा करणे नियमित शुल्काची सवलत ही फक्त १२ वी पुरवणी परीक्षेमधील विद्यार्थ्यांना राहील याची नोंद घ्यावी.

१२ वी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना दि. १०/०९/२०१६ नंतर प्रवेशाकरीता अतिरिक्त विलंबासाहीत प्रति दिन प्रति विद्यार्थी ५०/- रु. दंड लागू राहील.

विद्यापीठ अनुदान अयोगाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार सदर विद्यार्थ्यांचे १८० शैक्षणिक दिवस भरतील याची दक्षता प्राचार्यांनी घ्यावयाची आहे.

प्रवेश, पात्रता व इतर शुल्क विद्यापीठामध्ये जमा करण्याचा कालावधी सोबतच्या तक्त्याप्रमाणे राहील याची नोंद घ्यावी.

सहायक कुलसचिव
पात्रता विभाग

## Appendix - I

### प्रवेश, पात्रता व इतर शुल्काचा तक्ता

( फक्त १२ वी पुरवणी उत्तीर्ण परीक्षेतील विद्यार्थ्यांकरीता )

| अ.क्र. | तपशील | महाविद्यालयामध्ये प्रवेश देण्याची अंतिम मुदत | शुल्क | विद्यार्थ्यांचा पात्रता अर्ज व त्या संदर्भात कागदपत्रे जमा करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|
| १. | पदवी अभ्यासक्रम<br>बी.ए., बी.कॉम.व बी.एस्सी. / बी.एस्सी. (Entrepreneurship & Biotech) | १०/०९/२०१६ | रु. ७५/- पात्रता शुल्क व इतर शुल्काचा विद्यापीठ हिस्सा ( संबंधीत विभागाच्या विविध परीपत्रकानुसार) | १७/०९/२०१६ |

सुचना :- दि. १०/०९/२०१६ नंतर प्रवेशीत विद्यार्थ्यांना अतिरिक्त विलंब शुल्कासहित रु. ५०/- प्रति दिन प्रति विद्यार्थी दंड आकारला जाईल.